| MHWR030020832020 | खटला दाखल तारीख – | ०३.०६.२०२० |
|---|---|---|
| | खटला नोंदणी तारीख – | ०३.०६.२०२० |
| | खटला निकाल तारीख– | १८.०७.२०२६ |
| | कालावधी – ०६ वर्ष, ०१ महिने, १५ दिवस. | |

**भाग –' अ '**

**Form No. XXXII**

(**Title Page of the Judgment**)

(**Para** 44 (**i**) **of Chapter VI of Criminal Manual**)

## न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी (न्यायालय क्र.२), वर्धा, यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी – श्रीमती एम.आर.चव्हाण–हिवराळे)

**नियमित फौजदारी खटला क्र. ३५३/२०२०** — **अपराध क्र. ११३/२०२०**
[MHWR030020832020] — **निशाणी क्र. ३५**

महाराष्ट्र शासन तर्फे }
पोलीस निरीक्षक, }
पोलीस स्टेशन, देवळी, ता. व जि. वर्धा. } ... अभियोग पक्ष.

**–वि रु ध्द–**

विशाल वसंतराव चव्हाण, }
वय – ४४ वर्षे, व्यवसाय – मजुरी }
रा. पोस्ट ऑफीस जवळ, देवळी, }
ता. जि. वर्धा. } ... आरोपी.

........................................................................................................

श्रीमती डी. पी. कोठारी, सरकारी अभियोक्ता सरकार पक्षातर्फे.

श्री. पी. एस. मानसाता, विधीज्ञ आरोपीतर्फे

........................................................................................................

## दोषारोप – भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४ अन्वये.

### भाग –' ब '

### (Para 44 (ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| १) | गुन्हा घडल्याचा दिनांक | २१.०२.२०२० |
| २) | प्रथम खबर अहवाल दिनांक | २१.०२.२०२० |
| ३) | दोषारोप पत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०३.०६.२०२० |
| ४) | दोषारोप निश्चिती दिनांक | १६.०३.२०२१ |
| ५) | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०१.०८.२०२२ |
| ६) | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | ०२.०७.२०२६ |
| ७) | न्यायनिर्णयाचा दिनांक | १८.०७.२०२६ |

### आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | विशाल वसंतराव चव्हाण | २१.०२.२०२० | २२.०२.२०२० | भा.दं.वि. कलम ३२४ | निर्दोष | निर्दोष | --- |

### भाग –' क'

### (Para 44 (iii) of Chapter VI of Criminal Manual)

# LIST OF PROSECUTION/DEFENCE/COURT WITNESSES

**अ. अभियोग पक्ष –**

| अनु.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १) | अंकित अशोकराव टेकाडे | ०४ | पंच |
| २) | अमित नरेंद्रजी इंगळे | ०६ | पंच |
| ३) | निसार अजीज शेख | ०८ | साक्षदार |
| ४) | सौ. मेघा विशालराव चव्हाण | ०९ | फिर्यादी |
| ५) | पवन दामोधर झाडे | १७ | पोलीस साक्षदार |
| ६) | अरविंद परमेश्वर शिंदे | २३ | तपासी अधिकारी |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार जर असतील तर –**

| अनु. क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**क. न्यायालयीन साक्षीदार असतील तर -**

| अनु. क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**निशाणी कागदपत्रांची यादी**

**ड. अभियोग पक्ष -**

| अनु. क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १) | फिर्याद | १० |
| २) | प्रथम खबर अहवाल | ११ |
| ३) | क्युरीकरीता चे पत्र | २४ |
| ४) | वैद्यकीय अहवालाकरीता चे पत्र | २५ |

| | | |
|---|---|---|
| ५) | वैद्यकीय अहवाल | २६ |
| ६) | क्युरी अहवाल | २७ |

**इ. बचाव पक्ष -**

| अनु. क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| --- | --- | --- |

**ई. भौतीक वस्तु -**

| अनु. क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १) | वस्तु 'अ' | लाकडी बल्ली |

# न्यायनिर्णय

( घोषित दिनांक : १८/०७/२०२६ )

आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४ अन्वये खटला चालविण्यात आला.

२. **सरकार पक्षाचे प्रकरण थोडक्यात खालील प्रमाणे आहेः**

फिर्यादी मेघा ही आरोपीची पत्नी आहे. त्यांना दोन मुली असुन फिर्यादी ही नगर परिषद शाळेत नोकरी करते. ती मुलींसह आरोपीसोबत राहत होती. दिनांक २१/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजताच्या दरम्यान आरोपीने फिर्यादी सोबत तिच्या चारित्र्यावर संशय घेवुन वाद घातला. तिला लाकडी बल्लीने डाव्या हाताच्या मनगटावर मारल्यामुळे तिला सुजन आली. त्याने तिचे डावे गालावर बुक्कीने मारले. तसेच डावे बाजुला कमरेच्या खाली बल्लीने मारल्यामुळे मुका मार लागला. सदरहू फिर्यादीने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवली.

३. फिर्यादीच्या तक्रारीनुसार पोलीस ठाणे, देवळी येथे अप. क्र. ११३/२०२० भा.दं.वि. कलम ३२४ नुसार गुन्ह्याची नोंद झाली व गुन्हा तपासात घेण्यात आला. तपासकामी तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करून साक्षीदारांचे बयान नोंदविले. तपासाअंती त्यांनी आरोपीविरूध्द वरील कलमांतर्गत दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरूध्द भा.दं.वि. कलम ३२४ खालील दंडनिय अपराधाकरीता नि.क्र. २ प्रमाणे दोषारोप निर्धारित केले. आरोपीने त्याला गुन्हा कबुल नसल्याचे कथन नि.क्र. ३ अन्वये केले व खटला चालविण्याची मागणी केली. हवे तितके साक्षीदार झाल्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीचे कलम ३१३ (१ब) फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत बयाण नि.क्र. २४ खाली नोंदविण्यात आले. त्यात आरोपीने खोटे प्रकरण दाखल केले, असा बचाव घेतल्याचे दिसून येते.

५. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. सरकारी अभिवक्ता श्रीमती कोठारी यांनी अभिलेखाप्रमाणे युक्तिवाद केला असून आरोपीचे वकील श्री. मानसाता यांनी आरोपीविरुद्ध पुरावा न आल्यामुळे त्यांना निर्दोष बरी करण्यात यावे, अशी विनंती या न्यायालयापुढे केलेली आहे. सदर प्रकरणाच्या तथ्य व कथनानुसार खालील मुद्दे या न्यायालयापुढे न्यायनिवाडाकरीता विचारार्थ उपस्थित झालेले असून त्यांचे निष्कर्ष कारणेमिमांसा खालील प्रमाणे नोंदविण्यात आलेले आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, दिनांक २१/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० ते ११.३० वाजेच्या दरम्यान पोस्ट ऑफीस जवळ, मौजा देवळी | **नकारार्थी..** |

| | | |
|---|---|---|
| | येथे आरोपीने फिर्यादीला लाकडी बल्लीने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली, आणि त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३२४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला ? | |
| २. | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त केले.** |

## कारण मिमांसा

**मुद्दा क्रं. १ करीता –**

**६.** सदर प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ अन्वये गुन्हा असल्याने सदर कलमाची आवश्यक तत्वे सिध्द करण्याची जबाबदार अभियोग पक्षावर भारतीय साक्षी पुरावा अधिनियम कलम १०१[1] व १०२[2] अन्वये आहे.

**७.** सदर प्रकरणांमध्ये अभियोग पक्षाने एकूण ०६ साक्षदार तपासलेले आहेत. सा.क्र.१ अंकित टेकाडे नि.क्र. ०४ व सा.क्र.२ अमित इंगळे नि.क्र. ०६ हे या प्रकरणातील घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. परंतु त्यांनी घटनास्थळ जप्ती पंचनाम्याबाबत अभियोग पक्षाचे कथन फेटाळलेला आहे. सा.क्र.३ निसार शेख हे अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. परंतु त्यांनी घटनेबाबत काहीही

1 **भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ चे कलम १०१ – *शाबीतीची जबाबदारी* –** *जेव्हा कोणतेही न्यायीक प्रकरणात कुठल्याही पक्षाकडून अशी अपेक्षा किंवा मागणी असते की, न्यायीक नियमानुसार खटल्याचा निकाल कुठल्या नियमानुसार किंवा कुठल्या आधारे त्याचे बाजुला आहे अशा वेळी त्या पक्षाला शाबित करणे गरजेचे आहे की त्याची बाजु कोणते आधारावर हे आणि तशी बाजू न्यायालयाने मान्य केली पाहिजे.*

2 **भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ चे कलम १०२ – *शाबीतीची जबाबदारी कोणावर असते* –** *कोणतेही न्यायीक प्रकरणात, शाबीतीची जबाबदारी, वेगळ्या वेगळ्या पक्षाला वेगळया वेगळ्या प्रकरणात असते.*

माहिती नाही, असे साक्ष कथन केलेले आहे. सा.क्र.४ मेघा चव्हाण नि.क्र. ०९ ही सदर प्रकरणातील फिर्यादी आहे. सा.क्र.५ पवन झाडे नि.क्र.१७ हे मुद्देमाल क्युरीकरीता नेणारे पोलीस साक्षदार असुन सा.क्र.६ अरविंद शिंदे नि.क्र.२३ हे सदर प्रकरणातील तपासी अधिकारी आहे व त्यांनी त्यांच्या साक्ष कथनात या प्रकरणात केलेल्या तपास कार्याबाबत कथन केले आहे.

८. सा.क्र.४ मेघा चव्हाण नि.क्र. ०९ ही सदर प्रकरणातील फिर्यादी असुन तिने तिच्या सरतपासामध्ये तिच्या तक्रारी मधील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. तिने तिच्या सरतपासामध्ये कथन केले की, घटना दि. २१/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास त्यांच्या घरी देवळी येथे घडली. आरोपीने शुल्लक कारणावरुन वाद केला व शिवीगाळ केली. आरोपी हा तिच्या चारित्र्यावरुन शंका घेतो. आरोपीने तिला बुक्क्यांनी डाव्या गालावर व कंबरेला डाव्या बाजुला मारले. आरोपी लाकडी बल्लीने तिला कंबरेवर मारायला लागला तेव्हा तिने डावा हात आडवा केला तर ती हाताला लागली. त्यामुळे तिचा हात खुप सुजला व ठणक खुप होती, तिला देवळी येथील सरकारी दवाखान्यात नेण्यांत आले. देवळी रुग्णालयामध्ये एक्सरे नसल्यामुळे दुस–या दिवशी त्यांना वर्धेच्या सरकारी दवाखान्यात पाठविण्यांत आले. तेथे एक्सरे काढण्यांत आले. घटनेनंतर पोलिस घरी आले होते व त्यांनी पंचनामा केला होता. सदर लाकडी बल्ली आर्टीकल–अ वर असल्याचे तिने ओळखले.

९. तिने उलट तपासामध्ये मान्य केले आहे की, सदर घटनेच्या दिवशीपासून ते आजपर्यंत ती व आरोपी एकाच घरात राहात आहे. परंतु ते एकाच घरात वेगवेगळे राहत आहेत. ''डाव्या गालावर मारले, कंबरेला डाव्या बाजुला बुक्क्यांनीच मारले, वाद केला,

शिवीगाळ केली'', हा मजकुर तिने बयाण देतांना सांगितला होता, परंतु तो मजकुर तिच्या बयाणात नसल्याचे कारण ती सागू शकली नाही. प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद दाखल करण्याच्या आधी तिने कौटुंबिक हिंसाचार कायदयाअंतर्गत प्रकरण दाखल केले आहे. सदर प्रकरणातील रिपोर्ट दिला त्यावेळी ती बालवाडी शाळेमध्ये शिक्षिकेची नोकरी करीत होती. आर्टीकल–अ ही लाकडी बल्ली जप्तीनंतर ती पहिल्यांदाच बघत आहे. इतर विसंगत कथन तिने फेटाळले आहे.

**१०.** सा.क्र.१ अंकित टेकाडे नि.क्र.४ व सा.क्र.२ अमित इंगळे नि.क्र.६ हे घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. परंतु सदर साक्षदारांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. पोलिसांनी त्यांना पंच म्हणुन बोलाविले नव्हते व त्याच्यासमक्ष कोणतीही पंचनामा कारवाई झाली नाही असे कथन केले. सदर साक्षीदारांनी घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील त्यांच्या सह्या मान्य केल्या, परंतु त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. तसेच, सा.क्र.३ निसार शेख नि.क्र.८ हा अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. परंतु सदर साक्षदाराने त्याच्या पुराव्या दरम्यान अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. घटनेबाबत त्याला काहीही माहिती नाही. वरील तिनही साक्षीदार यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केले नसल्यामुळे त्यांना न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासणीच्या स्वरूपात पूरक प्रश्न विचारण्यात आले. तरी देखील अभियोग पक्ष आरोप सिध्द करण्यास समर्थ होईल असा कुठलाही पुरावा अभिलेखावर आणू शकले नाही. सबब, त्यांची साक्ष गृहीत धरण्यात येत नाही.

**११.** सा.क्र.५ पवन झाडे नि.क्र.१७ हे या प्रकरणातील जप्त मुद्देमाल क्युरी करीता नेल्याबाबतचे साक्षीदार आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये त्यांनी तपासी अधिकारी अरविंद

शिंदे यांच्या आदेशाने सदर प्रकरणातील जप्त बल्ली क्युरीसाठी ग्रामीण रूग्णालय, देवळी येथे नेल्याबाबत कथन केले आहे. त्यांनी उलट तपासामध्ये मान्य केले आहे की, कोणतीही ड्यूटी करण्यासाठी ड्युटी पास दिल्या जाते. हत्यार क्युरीसाठी नेतांना तपासी अधिकारी यांना मदतनीस दिला जातो व त्या दिवशी मदतनीस म्हणुन त्यांची ड्युटी होती. पत्रावर हस्ते म्हणुन त्यांचे नाव आहे. वेगळा ड्युटी पास दिला जात नाही. इतर विसंगत कथन त्यांनी फेटाळले आहे.

**१२.** सा.क्र.६ अरविंद शिंदे नि.क्र.२३ हे या प्रकरणातील तपासी अधिकारी आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये त्यांना या गुन्ह्याचा तपास मिळाला होता, त्या अनुषंगाने त्यांना फिर्याद, घटनास्थळ व जप्ती पंचनामा प्राप्त झाला होता, त्यांनी सदर तपासाचे अनुषंगाने साक्षीदारांचे बयाण घेतले, सदर प्रकरणातील शस्त्राबाबत क्युरी करीता पत्र नि.क्र.२४ दिले, तसेच फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेबाबत वैद्यकीय अधिकारी यांना पत्र नि.क्र.२५ दिले, त्या अनुषंगाने वैद्यकीय प्रमाणपत्र अहवाल नि.क्र. २६ आणि क्यूरी अहवाल नि.क. २७ प्राप्त केले व आरोपीविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या उलटतपासणीत विसंगत कथन फेटाळले आहे. सदर साक्षदार हे कार्यालयीन साक्षदार आहे. त्याचे विरूध्द आक्षेपार्ह कुठलेही कथन अभिलेखात सिध्द झालेले नाही आणि त्यांचे साक्ष कथन त्यांच्या तपासाच्या अनुषंगाने स्थिर राहलेले आहे.

**१३.** सदर प्रकरणातील अभियोग पक्षाचे कथन व अभिलेखावर आलेला पुरावा बघितला असता आरोपीने फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला दुखापत पोहचविण्याच्या हेतुने कमरे व डाव्या हाताच्या मनगटावर मारहाण केली.

**१४.** फिर्यादी सा.क्र.४ मेघा चव्हाण हिने तिचे साक्ष कथन नि.क्र.९ मध्ये कथन केले आहे की, घटना तिच्या राहते घरी घडली. त्याबाबतचे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच सा.क्र.१ अंकित टेकाडे नि.क्र.४ आणि सा.क्र.२ अमित इंगळे नि.क्र.६ यांनी घटनास्थळ पंचनाम्यावरील मजकुर फेटाळलेला असुन त्यावरील केवळ त्यांची स्वाक्षरी अनुक्रमे नि.क्र.५ व ६ सिध्द केली आहे. सा.क्र.६ तपास अधिकारी अरविंद शिंदे नि.क्र.२३ यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कथन केले आहे की, त्यांच्या तपासाच्या आधी घटनास्थळ पंचनामा झालेला होता व त्यांना तो तपासासोबत मिळाला. त्यामुळे त्यांनी तो पंचनामा केलेला नाही, असे अभिलेखावरुन सिध्द होते. तसेच दोन्ही पंच साक्षदारांनी सदर कथनाला दुजोरा दिलेला नाही.

**१५.** फिर्यादी सा.क्र.४ मेघा चव्हाण नि.क्र. ०९ हिने तिची फिर्याद नि.क्र.१० व त्याची छापील खबर नि.क्र. ११ मध्ये कथन केले आहे की, आरोपीने तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला मारहाण केली. तिने तिच्या सरतपासामध्ये नमुद केले आहे की, शुल्लक कारणावरुन वाद झाला होता. यावरुन वादातील कारण हे दुय्यम कथनामध्ये आलेले आहे. परंतु ''वाद'' झाला इतपतचे कथन अभिलेखावर प्रस्थापीत झाले आहे. सा.क्र.३ निसार शेख नि.क्र.८ हे फिर्यादीचे शेजारी आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये ते फिर्यादी व आरोपी यांना ओळखतात व त्यांच्यामध्ये वाद होत होते, इतपर्यंतचे कथनाला त्यांनी दुजोरा दिलेला आहे. परंतु सदर दिवशी घटना घडली किंवा नाही याबाबतचे कथन त्यांनी फेटाळलले आहे. सदर वाद झाला या कथनाबाबत आरोपीतर्फे संपूर्ण साक्षदारांचा उलटतपास बघितला असता वाद झाल्याचे कथन फेटाळण्यात आलेले नाही. सबब, पंच साक्षदाराचे विसंगत कथन बघितल्यावरही वरील निष्कर्षावरुन आरोपीची ओळख, घटनास्थळ आणि त्यांच्यामध्ये झालेला किरकोळ कारणावरुनचा वाद हे अभिलेखावरुन

सिध्द होते.

**१६.** फिर्यादी सा.क्र.४ मेघा चव्हाण नि.क्र. ०९ हिच्या कथना अन्वये तिला आरोपीने डाव्या गालावर बुक्कीने मारले, डाव्या हाताचे मनगटावर व कमरेवर बल्लीने मारले आणि ती बल्ली घरात होती व ती उचलून आरोपीने तिला मारले. तिने सदरची लाकडी बल्ली तिच्या सरतपसामध्ये आर्टिकल–अ वर असल्याचे ओळखले आहे. परंतु तिने तिच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, ''डाव्या गालावर मारले, कंबरेला डाव्या बाजुला बुक्क्यांनीच मारले, हा मजकुर तिने बयाण देतांना सांगितला होता, परंतु तो मजकुर तिच्या बयाणात नसल्याचे कारण ती सागू शकली नाही.'' याबाबत तपासी अधिकारी सा.क्र.६ अरविंद शिंदे नि.क्र.२३ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, फिर्यादीने सदर मजकूर बयाण देतेवेळी सांगितला होता. परंतु तो तिच्या बयाणात नमुद नाही याचे कारण त्यांनी सांगितलेले नाही. यावरुन आरोपीने फिर्यादीला गालावर मारले किंवा कमरेच्या खाली मारले हे कथन महत्वपुर्ण वगळणे ज्यातुन विरोधाभास निर्माण होतो (omission amounting to contradiction) अशा कथनामध्ये आल्याचे सिध्द होते. माननीय सर्वोच्च न्यायालय यांचे ***तहसिलदार सिंह विरुध्द उत्तर प्रदेश राज्य (१९५९ ए.आय.आर. १०१२)*** या प्रकरणांमध्ये दिलेले निर्देशक तत्त्वानुसार, *''एखादे महत्वपुर्ण वगळलेले कथन ज्यामधुन विरोधाभास निर्माण होतो असे कथन अभिलेखावर सिध्द झाल्यास सदर साक्षदाराचे सदर कथन हे त्याची विश्वासपात्रता आक्षेपित करते.''* सबब, सदर प्रकरणामध्ये आरोपीने फिर्यादीच्या डाव्या गालावर मारले किंवा कमरेच्या खाली कमरेवर मारले हे कथन विसंगत असल्याबाबत आरोपीने सिध्द केलेले आहे.

**१७.** फिर्यादी सा.क्र.४ मेघा चव्हाण नि.क्र. ०९ हिच्या कथनानुसार आरोपीने तिला बल्लीने डाव्या मनगटावर व कमरेच्या खाली मारले. सदर बाबत जप्ती पंचनाम्यावरील

दोन्ही पंच सा.क्र.१ अंकित टेकाडे नि.क्र.४ आणि पंच सा.क्र.२ अमित इंगळे नि.क्र.६ यांनी जप्ती पंचनाम्यावरील मजकुर फेटाळला असुन त्यावरील केवळ त्यांची स्वाक्षरी अनुक्रमे नि.क्र. ५ व ७ सिध्द केली आहे. तपासी अधिकारी सा.क्र.६ अरविंद शिंदे नि.क्र.२३ यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कथन केले आहे की, तपासाच्या आधी जप्ती पंचनामा झालेला होता व त्यांना तो तपासासोबत मिळाला. त्यामुळे त्यांनी तो पंचनामा केलेला नाही, असे अभिलेखावरुन सिध्द होते. तसेच सदर दोन्ही साक्षदारांनी सदर कथनाला दुजोरा दिलेला नाही. सबब, या प्रकरणातील जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. त्यामुळे या प्रकरणामध्ये फिर्यादीने जरीही कथन केले आहे की, तिने गुन्ह्यात वापरलेली बल्ली अभिलेखावर ओळखलेली आहे. परंतु तीच बल्ली तपासादरम्यान जप्त झाली किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते.

**१८.** तपासी अधिकारी सा.क्र.६ अरविंद शिंदे नि.क्र.२३ यांनी साक्ष कथन केले आहे की, त्यांना तपास मिळाल्यानंतर त्यांनी सदर शस्त्राबाबत क्युरी करण्याकरीता पत्र नि.क्र.२४ वैद्यकीय अधिकारी यांना पाठविले. त्याबाबतचा क्युरी अहवाल नि.क्र.२६ वर आहे. तसेच त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्याकरीता पत्र नि.क्र.२५ वैद्यकीय अधिकारी यांना पाठविले व त्याचा वैद्यकीय अहवाल नि.क्र.२६ सिध्द केलेले आहे. त्यांनी उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, नि.क्र.२४ व २५ वरील पत्र देतेवेळी त्यांनी पो.हवालदार सा.क्र.५ पवन झाडे यांना दिलेले डयुटीपास अभिलेखावर दाखल केलेले नाही किंवा सिध्द केलेले नाही. सा.क्र.५ पवन झाडे नि.क्र.१७ यांनी साक्ष कथन केले आहे की, त्यांना तपास अधिकारी सा.क्र.६ अरविंद शिंदे नि.क्र.२३ यांनी दिलेले पत्र नि.क्र.२४ व २५ आणि या प्रकरणामध्ये जप्त असलेली लाकडी बल्ली (जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही) ते क्युरीकरीता घेवून गेले होते. परंतु त्यांनी उलटतपासामध्ये मान्य केले आहे की,

त्या दिवशी त्यांना सदर हत्यार क्युरी करीता घेवुन जाण्याचा आवश्यक असलेला ड्युटी पास किंवा डयुटी चार्ज अभिलेखावर नाही. त्यामुळे त्यांना सदर प्रकरणातील मुद्देमाल क्युरीकरीता घेवुन जाण्याचा त्यांना अधिकार नव्हता, असे कथन अभिलेखावर प्रस्थापीत होते. त्याचप्रमाणे याबाबतचे वैद्यकीय अहवाल नि.क्र.२६ व क्युरी अहवाल नि.क्र.२७ हे सिध्द करण्याकरीता वैद्यकीय अधिकारी यांना तपासण्यात आलेले नाही. तसेच नि.क्र.२६ वरील क्युरी अहवाल यातील कथन देखील वैद्यकीय अधिका–यांमार्फत सिध्द करण्यात आलेले नाही. त्यामुळे फिर्यादी सा.क्र.४ मेघा चव्हाण नि.क्र. ०९ हिला कशाप्रकारची ईजा झाली होती, ती कशाप्रकारची होती, किंवा नाही हे कथन देखील अभिलेखावर सिध्द झालेले नाही. त्याचप्रमाणे क्युरी अहवाल नि.क्र.२७ हा या प्रकरणातील जप्त मुद्देमाल लाकडी बल्ली बाबत आहे, हे सिध्द झालेले नाही. तसेच या प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा व त्यातील कथन अभिलेखावर सिध्द केलेले नाही. सबब, हे संपुर्ण कथन की, फिर्यादीला सदर लाकडी बल्लीने दुखापत झाली, तीच बल्ली जप्त करण्यात आली आणि त्यातुनच फिर्यादीला दुखापत झाली, हे अभिलेखावर वाजवी शंकेपलीकडे सिध्द झालेले नाही.

**१९.** अभियोग पक्षाच्या कथनानुसार फिर्यादीला बुक्कयांनी अथवा लाकडी बल्लीने मारहाण झाली हे कथन फिर्यादी सा.क्र.४ मेघा चव्हाण नि.क्र. ०९, तसेच सा.क्र.५ पवन झाडे नि.क्र.१७ व तपासी अधिकारी सा.क्र.६ अरविंद शिंदे नि.क्र.२३ यांच्या साक्ष कथनांवरुन बळकटरित्या वाजवी शंकेपली अभिलेखावर सिध्द झालेले नाही. त्याचप्रमाणे या प्रकरणातील आरोपीचा हेतु किंवा त्याने हेतुपरस्पर फिर्यादीला मारहाण केली, हे कथन सिध्द होणे अनिवार्य होते. परंतु आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये घटनेच्या दिवशी वाद झाला इतपतचे कथन अभिलेखावर आलेले आहे. त्या दोघांमध्ये ३ ते ४ वर्षांपासून वाद होत होते,

असे सा.क्र.३ निसार शेख नि.क्र.०८ जे आरोपी व फिर्यादी यांचे शेजारी आहे त्यांच्या कथनावरुन सिध्द झाले आहे. त्याचप्रमाणे सदर साक्षदाराने उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, त्यांनी आजपर्यंत आरोपीने फिर्यादीला मारहाण करतांना बघितलेले नाही. त्याचप्रमाणे फिर्यादी सा.क्र.४ मेघा चव्हाण नि.क्र. ०९ हिने उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, तिने आरोपीविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे प्रकरण दाखल केल आहे. यावरुन देखील आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये वाद लक्षात येतात. परंतु त्यामधुन फिर्यादीला मारहण झाली इतपतचे कथन अभिलेखावर तिच्या साक्ष कथनावरुन सिध्द होत नाही. त्याबाबतचा इतर पुरावा देखील बळकटपणे अभिलेखावर सिध्द झालेला नाही.

**२०.** सदर प्रकरणामध्ये परिविक्षा अधिकारी यांचा गोपनीय अहवाल नि.क्र.३४ वर दाखल आहे. त्यावर घटनेनंतर ही आरोपी हा फिर्यादी व त्याच्या मुलींसह राहत आहे असे दिसुन येते. तसेच फिर्यादीने तिच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, घटने नंतर ती आरोपीसोबत एकाच घरात वेगळी राहत आहे. त्यांच्यामध्ये प्रकरण प्रलंबीत असतांना कुठले वाद झालेले नाहीत. यावरुन आरोपीची वागणुक गृहीत धरण्यात येते. त्याचप्रमाणे आरोपीने केलेली कृती ही भारतीय दंड विधान कलम ३२४ अन्वये असलेल्या तत्त्वांच्या चौकटीत बसत आहे, असे वाजवी शंकेपलीकडे सिद्ध करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरले आहे.

**२१.** आरोपीचा गुन्हा सिध्द होईपर्यंत तो निर्दोष असते असे फौजदारी न्यायशास्त्राचे सिध्द तत्व आहे. त्याचप्रमाणे फौजदारी प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने त्यांचे कथन वाजवी शंकेपलीकडे सिध्द करणे आवश्यक आहे आणि ते सिध्द होईपर्यंत आरोपी निर्दोष असल्याबाबतचे गृहीतक आहे. सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द असलेला पुरावा, फिर्यादीचे साक्ष कथन व सिध्द करण्यात आलेली फिर्यादी व त्याची छापील प्रथम खबर हे

वर केलेल्या निष्कर्षान्वये वाजवी शंकेपलीकडे सिध्द होत नाही. सबब, सदर गृहीतकाचा लाभ हा आरोपीच्या वतीने प्रस्थापीत होतो आणि अभियोग पक्ष त्यांचे कथन बळकटरित्या सिध्द करण्यास अपयशी ठरल्यामुळे मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देण्यात येते.

मुद्दा क्र. २ करिता –

२२. अभियोग पक्षाने त्यांचे कथन सिद्ध करण्याकरिता भारतीय पुरावा कायद्याच्या तत्त्वानुसार आरोपीचा गुन्हा हा वाजवी शंकिपलीकडे अभिलेखावर सिद्ध करणे अनिवार्य होते. वर नमुद केल्याप्रमाणे अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचे साक्ष कथन इतके बळकट नाही की जे भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ कलम १०१ व १०२ अन्वये आणि भारतीय न्याय शास्त्र अन्वये तत्वांचे अनुषंगाने बळकट समजण्यात यावे आणि त्या अनुषंगाने आरोपीचा गुन्हा सिध्द झाल्याचे कथन निर्भर करण्यात यावे. सबब, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले दोष सबळ पुराव्यानिशी सिध्द करण्यात अपयशी ठरले आहे. सदर प्रकरणामध्ये जप्त मुद्देमाल लाकडी बल्ली मुल्यहीन असल्यामुळे नियमाप्रमाणे नष्ट करणे योग्य होईल. सदरहू हे न्यायालय मुद्दा क्र. २ करीता पुढील आदेश पारित करीत आहे–

## आदेश

१. आरोपी विशाल वसंतराव चव्हाण याची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते. प्रकरणात सुरक्षा राशी जमा असल्यास अपिल कालावधी संपल्यानंतर आरोपीस परत करण्यात यावी.

३. जप्त मुद्देमाल लाकडी बल्ली अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावे.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे रूपये १०,०००/– चे नविन वैयक्तीक बंधपत्र द्यावे आणि त्याचा जुना जामीन कदबा पुढील सहा महिन्याकरीता कायम ठेवण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

MANGALA GAJANAN HIVARALE

Digitally signed by MANGALA GAJANAN HIVARALE
Date: 2026.07.18 17:37:45 +0530

स्थळ – वर्धा.
दि. १८/०७/२०२६

(श्रीमती एम. आर. चव्हाण (हिवराळे))
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(२रे न्यायालय), वर्धा.

Certified that PDF copy of Judgment supra is word-to-word identical to the original Judgment.

( I.K.Khan )
Stenographer Grade-II